NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE
नागपूर शहर पोलीस आयुक्तालय
(पोलीस वार्तापत्र)
(सायंकाळ)

**दिनांक ०२.०७.२०२६ गुरुवार**

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०१.०७.२०२६ चे १०.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार हे अंमली पदार्थ बाळगणारे, विक्री करणारे तथा सार्वजनिक ठिकाणी पिणारे आरोपींचे शोधात पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे सदर हद्दीत अंजुमन कॉलेजवळील हल्दीराम मार्ग येथे एक इसम एमडी पावडर विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी जाऊन, सापळा रचून रेड कारवाई कली असता, तेथे एका पांढरे रंगाचे ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ३१ एफजे २०४९ यावर दोन इसम संशयीतरित्या दिसून आले. त्यांना ताब्यात घेऊन, त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांचे नावे १) झोयेब रजा शहबाज कुरेशी वय २४ वर्षे, रा. कुरेशी मोहल्ला, गड्डीगोदाम, सदर नागपुर २) सचिन सुनिल विश्वकर्मा वय २१ वर्षे रा. जैन मंदीरजवळ, सदर, नागपूर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण ५.०३ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल व मोपेड असा एकुण १,४०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी तनिष्क गुप्ता वय अंदाजे २४ वर्ष रा. इंदोरा, जरीपटका, नागपूर याचे मार्फतीने विक्रीकरीता अंमली पदार्थ आणल्याचे सांगितले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सदर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करुन पुढील कार्यवाहीस्तव सदर पोलीसांचे स्वाधीन करण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि गजानन चांभारे, सफौ. राजेश तिवारी, पोहवा महेंद्र सडमाके, पोअं संतोष चौधरी, सुनिल कुंवर, संदीप पांडे, चापोअं प्रविण चव्हाण, विवेक श्रीपाद यांनी केली.



**<u>२) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यावसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०२.०७.२०२६ चे १०.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, मुन्नीबाई नावाची महिला पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, गंगा जमुना वस्ती, दिल्ली गल्ली, खत्री किराणाजवळ, नागपूर येथे महिलांना पैशांचे आमिष देऊन त्यांचेकडून देहव्यापार करवून घेत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, तेथे जाऊन, सापळा रचून रेड कारवाई केली असता, तेथे एक पिडीत महीला वेश्याव्यवसाय करतांना समक्ष मिळून आली. तिला विचारपुस केली असता, पाहिजे आरोपी महिला नामे मुन्नीबाई सुरेश कालखोर वय ६५ वर्ष रा. व्यंकोबा मुळे रोड, गंगा जमुना वस्ती, लकडगंज, नागपूर ही स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून, पिडीतेला पैशाचे आमिष देवुन तीचेकडुन देहव्यावसाय करवुन घेत असल्याचे सांगितले. घटनास्थळावरुन एका पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. पाहिजे आरोपी महिलेविरूध्द पोलीस ठाणे लकडगंज येथे कलम १४३(२), १४३(३) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पिडीतेस पुढील कारवाईस्तव लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील व त्यांचे पथकाने केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

डिसेंबर २०२२ ते जानेवारी २०२५ दरम्यान, फिर्यादी जयंत माणिकराव हरडे वय ३२ वर्षे रा. अर्जुनी रोड, ता. लाखांदूर जि. भंडारा यांना प्लॉट खरेदी करायचा असल्याचे त्यांनी आरोपी क्र. १) सुनिल चंद्रकांत दोषी वय ५२ वर्ष रा. फ्लॅट क्र. ४०२, पाचवा माळा, साईकृपा कॉम्प्लेक्स, बेसा, मनिषनगर, नागपूर यास सांगितले असता, त्याने पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्यीतील नरसाळा येथील गगनदीप को—ऑपरेटीव्ह सोसायटी मधील क्षेत्रफळ १५०० चौ.फुट असलेला प्लॉट क्र. ४ फिर्यादीस दाखविला. सदरील प्लॉटची मालक आरोपी २) सौ. प्रिती प्रविण चाचेरे वय ४७ वर्ष रा. फ्लॅट क्र. ४०२, पाचवा माळा, साईकृपा कॉम्प्लेक्स, बेसा, मनिषनगर, नागपूर ही असल्याचे खोटे सांगून, तिचे घरी ३२ लाख रुपयामध्ये प्लॉटचा सौदा केला. फिर्यादी यांनी आरोपी क्र. २ हिला वेळोवेळी रोख तथा चेकद्वारे ३२ लाख रुपये देऊन, विक्री करारनामा तथा पावर ऑफ अटार्नी करुन घेतली. फिर्यादी यांनी दिनांक ०४.०५.२०२३ रोजी नमुद प्लॉटची पाहणी केली असता, तेथे त्यांना सौ. सुलोचना सुरेश पटले यांचे नावाचा फलक लावलेला दिसल्याने फिर्यादी यांनी आरोपी क्र. १ यास संपर्क केला असता, आरोपीने शिवीगाळ केली. फिर्यादीने नमुद प्लॉटबाबत चौकशी केली असता, त्यांना नमुद प्लॉट हा आरोपी क्र. २ चे वडीलांनी दिनांक ३०.०८.१९९० रोजी नोंदणीकृत विक्रीपत्राद्वारे सौ. अलका प्रमोद येवले यांना विकला होता. त्यानंतर त्यांनी तो प्लॉट दिनांक ११.०३.१९९२ रोजी सौ. सुलक्षणा पटले यांना विकल्याचे समजले. फिर्यादीने आरोपींना पैसे परत मागितले असता, आरोपींनी जानेवारी २०२५ पावेतो १७ लाख रुपये फिर्यादीस परत केले. उर्वरित पैशांबाबत आरोपी हे टाळाटाळ करीत होते. यातील आरोपीतांनी संगनमत करुन नमुद प्लॉट हा आधीच आरोपी क्र. २ चे वडीलांनी विकला असल्याचे माहित असूनही, त्या प्लॉटचे स्वत:चे

नावाचे खोटे दस्तावेज सादर करुन, फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, त्यांचा अन्यायाने विश्वासघात करुन, १५ लाख रु. ची आर्थिक फसवणूक केली.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. अमजद शाह कादर शेख ९९११९९५१९१ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१६(२),३१८(४),३३८, ३३६(३),३४०(२),६१(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** सौ. अपेक्षा रितेश बोरकर वय २३ वर्षे रा. सिदधेश्वर वाडी, पलॉट क्र. १५, नंदनवन, नागपूर हया सोबत मुलगी कु. युवाक्षी रितेश बोरकर वय १ वर्ष हिचेसह दिनांक ३०.०६.२०२६ चे ०१.०० वा. सुमारास, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, डोक्याचे केस—काळे व लांब, डोळे—काळे, अंगात—पिवळया रंगाचा टॉप व लाल लॅगीन घातलेली असुन कु. युवाक्षीला पांढरी बनियान व पांढरी पॅन्टी घातलेली आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे तहसील</u>:—** टिकाराम ललितसिंग थापा वय ७२ वर्षे रा. टिव्ही टॉवर, क्वॉर्टर क्र. १९, सेमिनरी हिल्स, गिट्टीखदान, नागपूर हे दिनांक २६.०६.२०२६ चे ०५.४० पोलीस ठाणे तहसील हद्दीतील मेयो हॉस्पिटल येथून कोणाला काही न सांगता कुठेतरी निघून गेले.घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—४ फुट ४ इंच, डोक्याचे केस—पांढरे, दाढी मिशी—काळी पांढरी व बारीक, डोळे—काळे, अंगात—ग्रे रंगाचा टि—शर्ट व काळया रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी बोलतात. ओळखचिन्ह— चेहऱ्यावर मस्सा आहे.

**<u>३) पोलीस ठाणे तहसील</u>:—** शाम रामेश्वर पराते वय ४२ वर्षे रा. गोळीबार चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक शाळेजवळ, तहसील, नागपूर हे दिनांक ११.०६.२०२६ चे १०.०० पोलीस ठाणे तहसील हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता कुठेतरी निघून गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ४ इंच, डोक्याचे केस—काळे, डोळे—काळे, अंगात—चॉकलेटी रंगाचा शर्ट व कत्था रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी बोलतात. ओळखचिन्ह— चेहऱ्यावर पांढरे डाग आहेत.

**<u>४) पोलीस ठाणे जरीपटका</u>:—** विरु कल्लु गोंदड वय ४७ वर्षे रा. मेकोसाबाग, ख्रिश्चन कॉलनी, रवी किराणा दुकानाजवळ, जरीपटका, नागपूर हे दिनांक ०१.०७.२०२६ चे १४.५५ वा. पासून पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता कुठेतरी निघून गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट २ इंच, डोक्याचे केस व दाढी मिशी—पांढरी, अंगात—ग्रे रंगाचा टिशर्ट व निळया रंगाचा लोअरपॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी बोलतात.

**<u>५) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u>:—** कु. रोशनी अजस सनोडीया वय १४ वर्षे रा. वार्ड क्र. ४, बुध्दविहारजवळ, कुही नागपूर ह.मु. कामगार कॉलनी, पिपळा, सोनू शेख याचे घरी किरायाने, हुडकेश्वर ही दिनांक २८.०६.२०२६ चे २३.०० वा. पासून पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता कुठेतरी निघून गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट, डोक्याचे केस काळे व लांब, अंगात—पांढरा रंगाचा प्रिंटेड टॉप व हिरवा प्लाजो घातलेला आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलते.

**<u>६) पोलीस ठाणे मानकापूर</u> :–** कु. रोशनी जोतीराम आवळे वय ३२ वर्षे रा. मराठी शाळेजवळ, झिंगाबाई टाकळी, मानकापूर नागपूर हया दिनांक २६.०६.२०२६ चे १०.०० वा. सुमारास, पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मध्यम, उंची–५ फुट, डोक्याचे केस–काळे व लांब, डोळे–काळे, नाक–सरळ, अंगात–सलवार सुट घातलेला आहे. भाषा–मराठी/हिंदी बोलते.


सौ. अपेक्षा


टिकाराम


शाम


विरु


कु. रोशनी


कु. रोशनी

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, रुम क्र. ११०, नागपुर. | ३००१००५३/२००४ | कलम ३२४ भा.दं.वि. सहकलम ४,२५ भा.ह. का | १)शाहीद खान मुख्तार अहमद खान रा. मानकापूर मस्जिदजवळ, नागपुर.<br>२)पुष्पेंद्र उर्फ सोनू सत्यलाल शर्मा रा. एमएसईबी कॉलनी, क्वॉर्टर क्र. १, टाईप ४, नागपुर.<br>३)शाहरुख खान एजाज खान<br>४) अली उर्फ दिलनवाज एजाज खान दोन्ही रा. कोलबास्वामी कॉलनी, प्लॉट क्र. ए३, काटोल रोड, गिट्टीखदान नागपुर | ०३.७.२०२६ |
| २ | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०२७९३/२००७ | कलम ३१९ भादंवि | अर्जुन कुरुमन्ना बिजनपल्लीवार वय २९ वर्ष रा. राहुल नगर झोपडपट्टी, सोनेगाव, नागपूर | १७.०७.२६ |
| ३ | मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, एनआय कोर्ट, नागपूर | **१)** ३२८६७२९/२००५<br>**२)** ३२८६७२८/२००५<br>**३)** ३२८२५८२/२००५<br>४) ३२८५६१९/२००५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | अमन के. हेमानी रा. ९०, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपूर | ०६.०७.२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ५) ३२५२९२५/ २००५<br>६) ३२५२९२४/ २००५ | | | |

स्वा/—
( अंकुश राठोड )
पोलीस उपनिरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

वाहतूक परिमंडळ सिताबर्डी नागपूर शहर हद्दीतील महा. मेट्रो तर्फे मे. YFC & BBG Project कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) पर्यंत भुयार मार्गाचे बांधकाम सतत ०१ वर्षात करण्यात येणार आहे. सदरच्या मार्गावर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता नमुद रस्त्यावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडुन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

➢ फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतुक ही डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक येथुन उजवे वळण घेवुन पुढे महाराजबाग चौकातुन सोयीनुसार जातील किंवा झिरो माईल येथुन डावे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे इन्स्टीट्युट ऑफ सायन्स चौकाकडे जातील.

**इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

➢ इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतुक महाराजबाग चौकातुन डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक मार्गे फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडे जातील किंवा बोर्ड ऑफिस चौक येथुन उजवे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे झिरो माईल येथुन उजवे वळण घेवुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) चौकाकडे जातील

**सदर अधिसुचना दिनांक ०४.०७.२०२६ रोजी पासून ते दि. ०३.०८.२०२६ रोजी पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**

( **आदित्य मिरखेलकर, भापोसे** )

पोलीस उप आयुक्त,वाहतुक,

नागपूर शहर